ePaper
वर्ष - 9 । अंक -84 | UDYAM-MH-26-0158827

## निवडणुकीच्या तोंडावर मनसेला झटका, अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल



महाईन्यूज (TM)

### आतील पानांत


- टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव!
- पाकिस्तानचा भारत अ संघावर विजय
- बिहारच्या सरकारचा शपथविधी सोहळा
- २५ पेक्षा जास्त जागा जिंकणार नाही


www.mahaenews.com । सोमवार, दि. 17 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महा राजकारण: बिहार निकालाने महाराष्ट्राची गणितं बदलली

# बिहार विजयाचे महाराष्ट्रात पडसाद!

## वाटाघाटीला जागा नाही, घटक पक्षांच्या बार्गेनिंग पॉवरलाही ब्रेक

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (रालोआ) मिळविलेल्या घवघवीत बहुमताने महाराष्ट्राच्या राजकीय पटावर ठळक परिणाम घडवून आणला आहे. सर्वच आघाड्यांमध्ये जागावाटपाच्या वाटाघाटी ताणतणावात सुरू असताना बिहारमधील निकालाने महायुती तसेच महाविकास आघाडीतील 'बार्गेनिंग पॉवर'चे समीकरण पूर्णपणे बदलले आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंत भाजपसमोर आक्रमक भूमिका घेणारी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (राकां) आता समन्वय आणि तडजोडीचा सूर अवलंबत असल्याचे संकेत राजकीय वर्तुळातून मिळत आहेत.**



**महापालिका निवडणुकांसाठी तापलेले वातावरण**

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड आदी महापालिकांची निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांसाठी प्रतिष्ठेचा प्रश्न ठरत आहे. विशेषतः मुंबई आणि ठाणे या शिवसेनेच्या परंपरागत बालेकिल्ल्यांमध्ये पक्षाने जास्तीत जास्त जागा मिळविण्यासाठी जोरदार मागणी सुरू केली होती. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक प्रभागांमध्ये आग्रही वाटाघाटी सुरू केल्या होत्या.

मात्र, बिहारच्या निकालाने भाजपला मिळालेल्या बळाने महायुतीतील घटक पक्षांच्या तडाखेबाज मागण्यांना आळा बसल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

**घटक पक्षांच्या 'बार्गेनिंग पॉवर'ला मोठा धक्का**

बिहारमध्ये भाजप आणि एनडीएला मिळालेले यश म्हणजे आगामी लोकसभा आणि राज्यातील राजकारणासाठी मोठा मनोबलवर्धक परिणाम. त्यामुळे महाराष्ट्रातील महायुतीतील लहान-

- **बिहार निकालाने महाराष्ट्राची गणितं ढवळून काढली**
- **महायुती-महा विकास आघाडीतील जागावाटपावर मर्यादा**
- **घटक पक्षांची 'बार्गेनिंग पॉवर' कमकुवत**
- **शिवसेना-राष्ट्रवादीचा सुर बदलला; काँग्रेससह महाविकास आघाडीही नव्या समीकरणांत**

मोठ्या घटक पक्षांनी जागांवर केलेली आक्रमक मागणी आता मऊ झाल्याचे दिसत आहे.

**शिवसेनेची भूमिका बदलली**

ठाण्यात आतापर्यंत सर्वाधिक जागा लढविण्याचा आक्रमक दावा करणाऱ्या शिवसेनेने आता तुलनेने तडजोडीची भूमिका घेतली आहे.

मुंबईत तर, "भाजपशी कोणत्याही परिस्थितीत युती टिकवायची" असा सूर शिवसेनेतून उमटत असून जागावाटपात फारसा ताण घालायचा नाही, अशी अंतर्गत भूमिका दिसते.

भाजपनेही शिवसेनेला मुंबईत काही प्रमाणात झुकते माप देण्यास हरकत नसल्याचे वृत्त आहे. मात्र ते माप किती, हे अंतिम चर्चेनंतरच स्पष्ट होणार आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसची रणनीतीही सौम्य**

राष्ट्रवादी काँग्रेस (राकां) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही गटांनी आघाडीतील प्रमुख पक्ष म्हणून स्वतःचा प्रभाव दाखविण्यासाठी महापालिकांमध्ये काही महत्वाच्या जागांवर हक्क सांगितला होता. पण बिहारच्या निकालानंतर त्यांच्या भूमिकेतही व्यवहार्यता आणि सहकार्याचा सूर दिसत आहे.

### निवडणूक समीकरणांचा अंतिम खेळ आता महाराष्ट्रात

बिहारच्या निकालाने पाडलेली 'राजकीय छाया' महाराष्ट्राच्या राजकीय पटावर अधिक गडद होत असून महापालिका निवडणुका यापुढे राजकीय प्रतिष्ठा, अस्तित्व आणि आगामी विधानसभा–लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा मुख्य आधार ठरणार आहेत.

महायुती आणि महाविकास आघाडी दोन्हीही अंतर्गत तणावात असल्या तरी घटक पक्षांची आक्रमकता कमी, वाटाघाटींची भाषा मऊ, आणि सहकार्याच्या पर्यायांची पुन्हा मांडणी अशी एकूण राजकीय हवा बनत चालली आहे. आता सर्वांचे लक्ष आहे ते मुंबई आणि ठाणे महापालिकेतील अंतिम फॉर्म्युल्यावर. कारण या दोन्ही महापालिकांचे समीकरण बदलले तर 2026 च्या विधानसभा निवडणुकीचे चित्रही बदलू शकते.

**महाविकास आघाडीही नव्या वास्तवात**

भाजपला मिळालेल्या विजयाचा परिणाम महाविकास आघाडीवरही उमटत आहे. बिहारमध्ये काँग्रेसचा दणदणीत पराभव झाल्याने पक्षाची चर्चेतील पकड काहीशी सैल झाली आहे. मुंबई, ठाणे या महापालिकांमध्ये "स्वबळावर लढण्याचा विचार" काँग्रेसने व्यक्त केला असला तरी जमिनीवरील वास्तव आणि निवडणूक गणित पाहता हा निर्णय व्यवहार्यतेला धरून नसेल, अशी चर्चा आहे.

**राष्ट्रवादी (शप) आणि मनसेची आघाडी टिकवण्याची इच्छा**

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि मनसे यांनी मात्र भाजपविरोधात महाविकास आघाडीची ताकद एकत्र ठेवण्यावर भर दिल्याचे खात्रीलायक माहिती सुत्रांकडून मिळत आहे.

मनसेच्या एका ज्येष्ठ नेत्याने स्पष्ट केले आहे की, "शिवसेना (उबाठा) सोबत जागांसाठी अति ताणण्यापेक्षा आघाडी टिकवणे महत्त्वाचे. भाजपचा सामना करण्यासाठी सहकार्य आवश्यक."

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मधील एका खासदाराने सांगितले की, "आमच्या काही पारंपरिक जागाही आम्ही मनसेला देऊ. भाजपविरोधात आमचा व्यापक आघाडीचा प्रयत्न सुरूच राहील." या विधानांवरून महाविकास आघाडीत जागावाटपाचे फारसे कौर्य पसरलेले असले तरी समीकरण टिकविण्याची राजकीय गरज सर्व पक्षांना जाणवत आहे. बिहारचा निकाल म्हणजे 2025-26 राजकारणाचा 'ट्रिगर

## ज्येष्ठ शास्त्रज्ञाचा इशारा

## पेटंटची लढाई जिंकणाऱ्या ज्येष्ठ शास्त्रज्ञाचा इशारा

# जुगाड हा देशासाठी मोठा धोका

### विज्ञान-तंत्रज्ञानाचा सर्वसमावेशक वापर




।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**'देशाच्या विकासासाठी सृजन, संशोधन क्षेत्रात अधिक व्यापक सुधारणा आवश्यक आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या सर्वसमावेशक वापरातून सर्व नागरिकांना सर्व प्रकारच्या सुविधा कशा देता येतील, याचा विचार करायला हवा,' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शनिवारी व्यक्त केले.**

### कुणासाठी काम करत आहोत

पुस्तकाचे सहलेखक डॉ. सुशील बोर्डे यांनी डॉ. माशेलकर यांच्याशी संवाद साधला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय केळकर उपस्थित होते.डॉ. माशेलकर म्हणाले, 'सध्या जगातील अनेक लक्षाधीश मानसिक समाधानासाठी सामाजिक कार्याकडे वळत आहेत. कमीत कमी संसाधनात जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याचा हा काळ आहे. मात्र, हे करत असताना आपण नक्की कुणासाठी काम करत आहोत, याचा विचार करायला हवा.

'कमीतून अधिकांसाठी अधिक' हे सूत्र प्रत्यक्षात अमलात आणायचे असल्यास करुणा, नावीण्य आणि व्यापक दृष्टिकोनासह राजकीय इच्छाशक्ती गरजेची आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या वतीने डॉ. माशेलकर लिखित 'मोअर फ्रॉम लेस फॉर मोअर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानिमित्ताने पुस्तकाचे सहलेखक डॉ.सुशील बोर्डे यांनी डॉ.माशेलकर यांच्याशी संवाद साधला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय केळकर उपस्थित होते.डॉ. माशेलकर म्हणाले, 'सध्या जगातील अनेक लक्षाधीश मानसिक समाधानासाठी सामाजिक कार्याकडे वळत आहेत. कमीत कमी संसाधनात जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याचा हा काळ आहे. मात्र, हे करत असताना आपण नक्की कुणासाठी काम करत आहोत, याचा विचार करायला हवा. केवळ नफा मिळवण्यासाठी काम न करता, अधिकाधिक लोकांना अधिक चांगल्या दर्जाची सुविधा देण्यासाठी काम करणे अपेक्षित आहे. त्यासाठी विज्ञानाचा वापर करून नवे सृजन करायला हवे.''सध्या उत्पादन तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीन जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. मात्र, तंत्रज्ञानाच्या सर्वसमावेशक वापरात भारत हा चीनपेक्षाही पुढे आहे. कमीत कमी साधनात अधिकाधिक उत्पादन मिळवायचे असल्यास तंत्रज्ञान सर्वसमावेशक असणे गरजेचे असते.

नवे उद्योग उभारत असताना अनेक अडथळे येत असतात. मात्र, 'कमीतून अधिकांसाठी अधिक' या सूत्राच्या आधारे यश संपादन करता येते,' असेही त्यांनी सांगितले. 'तुमचे मूळ विसरू नका. तुमच्याकडे असलेल्या ज्ञानाचा वापर, तुम्ही जिथून येता, त्यांच्यासाठी करायला हवा,' असा सल्लाही डॉ. माशेलकर यांनी दिला.'देशाच्या टेलिकॉम क्षेत्रात 'जिओ' ही मोठी क्रांती होती. त्याकाळात जिओसमोर अनेक अडचणी होत्या. जिओने दिलेली सुविधा आणि सूट हा धाडसी निर्णय होता. अनेकांनी त्यावर टीका केली. मात्र, नव्या कल्पना आणि सृजनाच्या आधारे जिओने प्रत्येक अडचणींवर मार्ग शोधला. 'कमीतून अधिकांसाठी अधिक' या सूत्रामुळेच जिओचा प्रयोग प्रचंड यशस्वी झाला,' असे बोर्डे यांनी नमूद केले.ते म्हणाले, 'आरोग्याच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. मात्र, हे तंत्रज्ञान सर्वसमावेशक नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना अनेक मुलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागते. सगळेच आजार वाढत आहेत. प्राथमिक तपासणी आणि तातडीने निदान यात मोठा फरक आहे. देशाच्या आरोग्य क्षेत्रात 'कमीतून अधिकांसाठी अधिक' या सूत्राने काम करून नवे तंत्रज्ञान आणि सृजन आवश्यक आहे. त्यामुळे मध्यस्थांची संख्या कमी होऊन सामान्यांना थेट लाभ होणे शक्य होईल.'भारत 'जुगाड' करण्यात पुढे आहे, असे म्हटले जाते. मात्र, देशासाठी जुगाड हा मोठा धोका आहे. त्यात उत्पादनाच्या दर्जाची आणि सुरक्षेची शाश्वती नसते. त्यामुळे जुगाडू देश, अशी आपली ओळख होता कामा नये.तंत्रज्ञानाचा वापर स्त्रिया आणि समाजातील वंचित घटकांसाठी करणे, हाच या सूत्राचा उद्देश आहे. त्यातूनच खरे यश मिळवता येते. 'कमीतून अधिकांसाठी अधिक' हे सूत्र प्रत्यक्षात अमलात आणायचे असल्यास करुणा, नावीण्य आणि व्यापक दृष्टिकोनासह राजकीय इच्छाशक्ती गरजेची आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या वतीने डॉ. माशेलकर लिखित 'मोअर फ्रॉम लेस फॉर मोअर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

# लोणावळ्यात कॅब चालकांची गुंडगिरी!

## बाहेरच्या चालकाला बेदम मारहाण, गाडी फोडल्याचा व्हिडिओ व्हायरल



।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**लोणावळ्यात बाहेरचे आणि स्थानिक कॅब चालक यांच्यात वाद पेटला आहे. बाहेरच्या कॅब चालकांना बेदम मारहाण करण्यात येत असून, त्यांच्या कॅबची तोडफोड करण्यात आली. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी सोन्या गुप्ता नावाच्या संशयित व्यक्तिला ताब्यात घेतले आहे, जो व्हिडिओमध्ये कॅबची तोडफोड आणि कॅब चालकाला मारहाण करताना दिसत आहे.**

### सोशल मीडियावर व्हायरल

अशी गहिवरून कॅब चालकाने सोन्या गुप्ताला विनंती केली. तरीही सोन्या गुप्ता ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. त्याने कॅबची मागील आणि पुढील काच दगडाने फोडली, तसेच त्याला धक्काबुक्की करत मारहाण केली आहे. ही घटना लोणावळ्यात शनिवारी रात्री पावणे आठच्या सुमारास घडली आहे. हा व्हिडिओ सोन्या गुप्ताच्या मित्रांनी मोबाईलमध्ये चित्रित केला आहे. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.सोन्या गुप्ताला ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे, असे लोणावळा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांनी सांगितले.

"दादा, मी नाष्टा करायला गेलो होतो. गाडी फोडू नका ना," अशी गहिवरून कॅब चालकाने सोन्या गुप्ताला विनंती केली. तरीही सोन्या गुप्ता ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. त्याने कॅबची मागील आणि पुढील काच दगडाने फोडली, तसेच त्याला धक्काबुक्की करत मारहाण केली आहे. ही घटना लोणावळ्यात शनिवारी रात्री पावणे आठच्या सुमारास घडली आहे. हा व्हिडिओ सोन्या गुप्ताच्या मित्रांनी मोबाईलमध्ये चित्रित केला आहे. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.सोन्या गुप्ताला ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे, असे लोणावळा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांनी सांगितले आहे. याआधी देखील अशाच प्रकारे बाहेरच्या कॅब चालकांना मारहाण करून धमकावण्यात आले आहे, अशी माहिती कॅब चालकांनी दिली आहे. या अशा व्यक्तींना स्थानिक नेत्यांचा आणि आमदारांचा वरदहस्त असल्याचं बोललं जात आहे. अशी गुंडगिरी करणे कितपत योग्य आहे? अशा व्यक्तींना पाठीशी घालणे देखील नक्कीच गुन्हा आहे, असे बोलले जात आहे. घटनेचा अधिक तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करत आहेत.

## मिशन- PCMC: आरक्षण सोडतीतील “गुडलक” मुळे

# चिंचवड विधानसभेत भाजपाचा दबदबा!

### भाजपा निवडणूक प्रमुख शंकर जगताप अन् शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे “क्लिन स्वीप”च्या तयारीत!

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका क्षेत्रात एकूण 32 प्रभाग आणि 128 नगरसदस्य संख्या आहे. 2017 मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये भाजपाने सर्वाधिक 77 जागा जिंकल्या होत्या. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्या जोडीने महापालिकेवर “कमळ” फुलवले होते. आता सुमारे 9 वर्षांनंतर निवडणुका होत आहेत. दरम्यानच्या काळात राज्यात आणि स्थानिक पातळीवर अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली आहेत.**

शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा या तीन मतदार संघांचा विचार करता ~~सर्वाधिक 13 प्रभाग चिंचवड मतदार संघा~~त येतात. त्यामध्ये 52 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असतील. विशेष म्हणजे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्यावर भाजपाने “पिंपरी-चिंचवड जिल्हा निवडणूक प्रमुख” पदाची धुरा दिली आहे.

**प्रभाग क्रमांक: १६ — रावेत**

रावेत, मामुर्डी आणि किवळे या भागात नव्याने गृहनिर्माण प्रकल्प विकसित झाले आहेत. गत निवडणुकीत राष्ट्रवादीच्या प्रज्ञा खानोलकर केवळ सुमारे 250 मतांनी निवडून आल्या आहेत. राष्ट्रवादीचे दिग्गज माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे आहेत. मात्र त्यांना आव्हान देण्यासाठी भाजपाकडे दीपक भोंडवे यांनी जोरदार तयारी केली आहे. नव्या आरक्षण सोडतीनंतर या वॉर्डमध्ये कोणताही मोठा बदल झाला नाही, त्यामुळे हा प्रभाग ‘सेफ झोन’ म्हणून गणला जात आहे. सोसायटीधारकांचे किमान 15 हजार मतदान आहे, हे मतदान निर्णायक ठरणार आहे. दिलीप राऊत यांच्या सौभाग्यवती सर्वसाधारण गटातून पुन्हा इच्छुक आहेत. माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, बाळासाहेब तरस, दीपक भोंडवे, नवनाथ लोखंडे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रज्ञा खानोलकर आणि संगीता भोंडवे हे दावेदार चर्चेत आहेत. खुल्या प्रवर्गातील महिला आणि पुरुष या दोन्हींसाठी जागा खुल्या असल्याने काही राजकीय दांपत्ये मैदानात उतरण्याची शक्यता आहे.

**प्रभाग क्रमांक : १७ — चिंचवडे नगर**

बिजलीनगर, प्रेमलोक पार्क आणि भोईरनगर या घनदाट वस्ती असलेल्या प्रभागात आरक्षणातील बदलामुळे राजकीय गणिते बिघडली आहेत. मागास प्रवर्गातील गट ‘अनुसूचित महिला’ म्हणून घोषित झाल्याने नामदेव ढाके, राजेंद्र साळुंखे यांसारखे माजी दावेदार अडचणीत आले आहेत. गत निवडणुकीत शेखर चिंचवडे यांच्या सौभाग्यवती करुणा चिंचवडे या सर्वाधिक मतांनी निवडून आल्या होत्या. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते भाऊसाहेब भोईर थोड्या मतांच्या फरकाने पराभूत झाले होते. त्यांच्या विरोधात सचिन चिंचवडे निवडून आले होते. नामदेव ढाके यांच्यासमोर ‘स्ट्राँग’ उमेदवार नव्हता. या प्रभागात पूर्वी तीनवेळा ढाके यांचा पराभव झाला



होता. ढाके यांना वेळी महिला उमेदवार द्यावा लागेल. तसे झाल्यास प्रभागातून भाजपा चांगली कामगिरी करेल, असे चित्र आहे.

**प्रभाग क्रमांक : १८ — केशवनगर**

चिंचवड, केशवनगर आणि वेताळनगर परिसराचा हा प्रभाग या वेळेस खुला व सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झाल्याने अनेक दिग्गजांनी तयारी सुरू केली आहे. गत निवडणुकीत मागास प्रवर्गातून लढलेले सुरेश भोईर, संदीप चिंचवडे, प्रदीप सायकर यांना या वेळी खुल्या प्रवर्गातून उमेदवारी घ्यावी लागेल. आरक्षणातील फेरबदलामुळे महिलांसाठी तीव्र लढत अपेक्षित आहे. गावकीभावकी आणि नातेसंबंधांचे समीकरण इथे निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. अश्विनी चिंचवडे, पद्मजा भोईर, मनिषा चिंचवडे ओबीसीमधून इच्छुक आहेत. ॲड. मोरेश्वर शेडगे, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर असे ओपनमधून इच्छुक आहेत. विधानसभा निवडणुकीत आमदार जगताप यांना या प्रभागातून सुमारे 12 हजार मतांचे लीड आहे. या भागात भाजपाच हक्काचा मतदार आहे. त्यामुळे या ठिकाणी पक्षाचे चारही नगरसेवक निवडून येतील.

**प्रभाग क्रमांक : २२ — काळेवाडी**

गतनिवडणुकीत या प्रभागातून भाजपाच्या चारही उमेदवारांचा पराभव झाला होता. गेल्या 10 वर्षांत प्रभागातील राजकीय परिस्थिती बदललेली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत या प्रभागामध्ये पक्षाच्या उमेदवारांना लीड आहे. काळेवाडी परिसरातील राजकीय समीकरणे नव्या आरक्षणानंतर अधिक रंगतदार झाली आहेत. इतर मागासवर्गीय प्रवर्ग आता महिलांसाठी राखीव असल्याने ज्योती भारती, विजया सुतार, अनिता पांचाळ आणि प्रतिभा ताम्हणकर यांची नावे आघाडीवर आहेत. विनोद तापकीर, सोमनाथ तापकीर, हर्षल नढे इच्छुक आहेत. सर्वसाधारण महिला प्रवर्गातून विमल काळे, कोमल काळे आणि नीता पाडाळे या प्रमुख इच्छुक आहेत. तसेच, संतोष कोकणे, विनोद नढे, सागर तापकीर, मच्छिंद्र तापकीर हे तगडे दावेदार आहेत. भाजपामध्ये नवीन प्रवेश होतील, असे चित्र आहे. त्यामुळे भाजपा या प्रभागात किमान 2 नगरसेवक निवडून येतील.

**प्रभाग क्रमांक : २३ — थेरगाव**

गत निवडणुकीत भाजपाच्या 3 जागा निवडून आल्या होत्या. थेरगावमध्ये या वेळी ओबीसी आरक्षणातील बदलामुळे पुरुष उमेदवारांनाही संधी खुली झाली आहे. मागील निवडणुकीत महिला आरक्षणामुळे मर्यादित स्पर्धा होती, मात्र आता पुरुष उमेदवारांची संख्या वाढणार आहे. विमल जगताप, हेमा अडसूळ, मनीषा पवार या महिला दावेदारांबरोबरच तानाजी बारणे, अभिषेक बारणे, निलेश बारणे, संदीप गाडे, संतोष आणि सचिन बारणे हे पुरुष गटात इच्छुक चर्चेत आहेत. बारणे कुटुंबाचा प्रभाव कायम असून, या प्रभागात पारंपरिक आणि नव्या चेहऱ्यांमध्ये संघर्ष दिसेल.

**प्रभाग क्रमांक २४ : — बेलठीका नगर**

खासदार श्रीरंग बारणे यांचे वर्चस्व असलेल्या या प्रभागात गत निवडणुकीत दोन शिवसेना आणि भाजपा-1 अपक्ष- 1 असे उमेदवार जिंकले आहेत. यावेळी आरक्षण बदलामुळे राजकीय समीकरणे पूर्णपणे उलथापालथ झाली आहेत. अनुसूचित जातीचे आरक्षण रद्द होऊन प्रभाग खुला झाल्याने शिवसेना (उद्धव ठाकरे गट) शहराध्यक्ष सचिन भोसले यांची अडचण वाढली आहे. त्यांनी खुल्या प्रवर्गातून लढण्याची घोषणा केली असून त्यामुळे स्थानिक राजकारण ढवळून निघाले आहे. बारणे कुटुंबाचे वर्चस्व कायम असून, विश्वजीत बारणे, निलेश बारणे, सिद्धेश्वर बारणे, जयदीप माने आणि गणेश गुजर हे प्रमुख इच्छुक आहेत. खासदार बारणे यांचे पूत्र विश्वजित बारणे या प्रभागातून निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी भाजपाला आव्हान निर्माण झाले आहे.

**प्रभाग क्रमांक : २५—ताथवडे-पुनावळे-वाकड**

गत निवडणुकीत भाजपाच्या चारही उमेदवारांचा पराभव झाला होता. मात्र, आता परिस्थिती बदलेली आहे. नव्याने निर्माण झालेल्या सोसायट्या आहेत. त्या ठिकाणी 20-25 हजार मतदान वाढले आहे. विधानसभा निवडणुकीत राहुल कलाटे यांना या प्रभागातून आमदार शंकर जगताप यांच्यापेक्षा कमी मतदान झाले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम या ठिकाणी चांगले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गात बदल झाल्याने या वेळी पुरुष आणि महिला दोघेही स्पर्धेत राहणार आहेत. कुणाल वाव्हळकर, सागर ओव्हाळ, संभाव्य दावेदार असून, रेखा दर्शिले, रेश्मा भुजबळ या ओबीसी महिला प्रवर्गात चर्चेत आहेत. भारती विनोदे ओपन महिलांमधून इच्छुक आहेत. भाजपाचे विशाल कलाटे, राम वाकडकर, नवनाथ ढवळे, राहुल काटे, अमोल कलाटे, श्रीनिवास कलाटे यांची नावे चर्चेत आहेत. राष्ट्रवादीचे मयूर कलाटे, संदीप पवार, अजित पवार खुल्या गटातून आणि ओबीसीमधून तुषार ताम्हाणे चर्चेत आहेत. यांच्यास चेतन भूजबळ यांच्या सौभाग्यती मैदानात उतरणार आहेत. ओपन महिला प्रवर्गातून कलाटे, पवार, वाकडकर कुटुंबियांतून चाचपणी सुरू आहे. या प्रभागातील राहुल कलाटे यांच्याविरोधात एकजुटीने उमेदवार दिल्यास भाजपच्या चारही जागाही निवडून येतील, असे चित्र आहे.

**प्रभाग क्रमांक: २६ — पिंपळे निलख**

गत निवडणुकीत चारही जागा भाजपाने जिंकल्या होत्या. या प्रभागात अनुसूचित जाती

## चिंचवड मतदार संघात भाजपा 40+ जागा जिंकणार!

आमदार शंकर जगताप यांनी आगामी निवडणुकीच्या निमित्ताने मतदार संघात प्रभावी तयारी केली आहे. आरक्षण सोडत झाल्यानंतर तात्काळ बैठका आणि चाचपणी सुरू केली आहे. संभाव्य पक्षप्रवेश नेतृत्त्वाखाली भाजपाचे संपूर्ण प्रभागांमध्ये प्रभावी समीकरण तयार झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दिग्गज उमेदवार नाना काटे, भाउसाहेब भोईर, संतोष कोकणे, प्रशांत शितोळे, अतुल शितोळे यांना स्वत:चा प्रभागावर वर्चस्व ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागेल. त्यानंतर पक्षाची कामगिरी करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी असा थेट संघर्ष झाल्यास भाजपा 40+ जागा जिंकेल, असा दावा भाजपाच्या ‘कोअर कमिटी’तून केला जात आहे.

आरक्षण पुरुषांसाठी खुलं झालं असून, विनायक गायकवाड हे सेफ झोनमध्ये आहेत. त्यांच्या जनसंपर्कामुळे त्यांचा विजयाचा मार्ग तुलनेने सोपा मानला जात आहे. सर्वसाधारण आणि मागास प्रवर्गातून गणेश कस्पटे, संदीप कस्पटे, आरती चोंधे, स्वाती कलाटे हे चर्चेत आहेत. स्थानिक कुणबी समाजाचे वर्चस्व इथे निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. संदीप कस्पटे भाजपाचे पॅनेलप्रमुख म्हणून काम करतील, असे बोलले जाते. सचिन साठे यांच्या सौभाग्यवती निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा हा प्रभाग आहे. कामठे गत निवडणुकीत भाजपाच्या तिकीटावर निवडून आले होते. मधल्या काळात त्यांनी भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप करीत राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. या प्रभागात भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट अशी लढाई होईल.

**प्रभाग क्रमांक: २७ — रहाटणी**

गत निवडणुकीत या प्रभागातून भाजपाचे चारही नगरसेवक निवडून आले होते. या प्रभागात आरक्षण कायम राहिल्याने जुनी गटबाजी पुन्हा तीव्र झाली आहे. बाबासाहेब त्रिभुवन, युवराज दाखले, दीपिका ढगे, अनिता तपकीर, अनिता तांबे, उल्हास कोकणे, विनोद तपकीर हे प्रमुख दावेदार आहेत. तसेच, चंद्रकांत नखाते निर्णायक भूमिकेत दिसणार आहेत. देविदास तांबे आणि गणेश नखाते हे नव्या चेहऱ्यांपैकी आहेत. पारंपरिक गटबाजी व नवे चेहरे यांच्यातील लढतीमुळे हा प्रभाग विशेष चर्चेत आहे. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा प्रभाव असलेला हा प्रभाग असून, भाजपाच्या चारही जागा निवडून आणण्यासाठी काटे प्रयत्नशील राहतील, असे चित्र आहे.

**प्रभाग क्रमांक: २८ — पिंपळे सौदागर**

भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा हा प्रभाग आहे. या प्रभागाला शहराचे नेतृत्व करण्याची संधी पहिल्यांदा मिळाली आहे. भाजपाला मानणारा मोठा वर्ग या प्रभागात आहे. शत्रुघ्न काटे जे उमेदवार देतील, ते उमेदवार या ठिकाणाहून निवडून येतील, असे चित्र आहे. स्मार्ट सिटीसारखा विकसित भाग म्हणून ओळखला जाणारा हा प्रभाग स्थिर राजकीय समीकरणांसाठी प्रसिद्ध आहे. आरक्षणात कोणताही बदल झालेला नाही. भाजपाचे शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे आणि त्यांच्या पत्नी शीतल काटे हे प्रमुख दावेदार आहेत.

उच्चशिक्षित आणि व्यावसायिक मतदारसंख्या जास्त असल्याने या प्रभागात मुद्देसूद आणि प्रतिमाधारित प्रचार होणार आहे.

**प्रभाग क्रमांक: २९ — पिंपळे गुरव**

भाजपाचे आमदार शंकर जगताप यांचा प्रभाव असलेला हा प्रभाग राजकीय दृष्ट्या भाजपाच्या ताब्यात आहे. एससी महिला जागा झाल्याने सागर आंगोळकर अडचणीत आले असून, उषा मुंढे आणि शकुंतला धराडे या महिला उमेदवारांची चुरस रंगणार आहे. ओबीसी जागा कायम असल्याने शशिकांत जगताप मजबूत स्थितीत आहेत. सर्वसाधारण खुली जागा झाल्याने राजू लोखंडे, तानाजी जवळकर, संदेश नवले हे नवे दावेदार मैदानात उतरणार आहेत. या प्रभागातून भाजपाचे चारही जागा निवडून येतील, असा दावा केला जातो.

**प्रभाग क्रमांक: ३१—नवी सांगवी / पिंपळे गुरव**

माजी नगरसेवक नवनाथ जगताप यांचा प्रभाव या प्रभागात आहे. आरक्षण फेरफारामुळे काही माजी नगरसेवक अडचणीत आले आहेत. अंबरनाथ कांबळे यांची एससी महिला जागा झाल्याने त्यांनी कुटुंबातील महिलेला मैदानात उतरवण्याची शक्यता आहे. माधवी राजापुरे यांच्या जागी ओबीसी खुला प्रवर्ग झाल्याने स्पर्धा वाढणार आहे. सीमा चौगुले या सर्वसाधारण महिला जागेत सेफ झोनमध्ये आहेत, तर नवनाथ जगताप, राजेंद्र जगताप हे खुल्या गटातून बलाढ्य दावेदार आहेत. या प्रभागातून भाजपाचे किमान 3 जागा निवडून येतील, असे निरीक्षण आहे.

**प्रभाग क्रमांक: ३२ — जुनी सांगवी**

माजी महापौर उषा ढोरे यांचा प्रभाव कायम असून, त्यांची सर्वसाधारण महिला जागा कायम राहिल्याने त्या पुन्हा रिंगणात आहेत. हर्षल ढोरे हे खुल्या जागेत मजबूत उमेदवार असून, अजित पवार गटाचे अतुल शितोळे आणि प्रशांत शितोळे हे प्रमुख प्रतिस्पर्धी असतील. ओबीसी महिला जागा बदलल्याने शारदा सोनवणे यांची अडचण झाली आहे. एससी महिला जागेमुळे संतोष कांबळे यांचा पर्यायही बदलावा लागेल. सांगवीतील ढोरे कुटुंबाचे वर्चस्व आहे. या प्रभागातून भाजपा चांगली कामगिरी करेल, असा दावा केला जातो.

# डीपफेक'च्या धोक्यांना लगाम



भूमिका

**देशात सायबर गुन्ह्यांचे स्वरूप आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पातळीवर पोहोचले आहे. पारंपरिक फसवणुकीच्या पद्धतींना सोडून आत्ता सायबर गुन्हेगार कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय आणि त्यावर आधारित डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. या नव्या तंत्रज्ञानामुळे गुन्हेगारांना एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचा चेहरा, आवाज आणि बोलण्याची पद्धत हुबेहूब नक्कल करणे शक्य झाले आहे.**

या तंत्रज्ञानाचा वापर करून सध्या देशभरात बनावट औषधांच्या विक्रीचा एक नवीन फसवणुकीचा प्रकार उभा राहिला आहे. जपपूर सायबर क्राईम ऑफेन्सचे एसीपी सोन चंद यांनी या घोक्याबाबत गंभीर इशारा दिला असून, अनेक ठकसेन आता नेते, अभिनेते, डॉक्टर आणि प्रसिद्ध सेलिब्रिटी यांच्या बनावट विडीओ आणि ऑडिओ क्लिप्स तयार करून त्यांच्यामार्फत औषधांच्या खोट्या जाहिराती प्रसारित करत असल्याचे महटले आहे. विशेष म्हणजे, या बनावट क्लिप्सचा सर्वाधिक परिणाम डायविटीव अर्थात शुगरच्या रुग्णांवर होत आहे.भारतामध्ये सुमारे १० कोटीपेक्षा जास्त नागरिक मधुमेहाने ग्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर या रुग्णवर्गाला 'टार्गेट ऑडियन्स' म्हणून वापरून सायबर ठकसेन मोठ्या प्रमाणावर बनावट औषधांची विक्री करत आहेत. अशा रुग्णांमध्ये लवकर बरे होण्याची तीव्र इच्छा



असते आणि हीच मानसिक कमजोरी ठकसेनांच्या फायद्याची ठरते. सायबर पोलिसांच्या तपासानुसार, है ठकसेन एखादा मुख्यमंत्री, अक्षय कुमार, हेमा मालिनी यांच्यासारख्या प्रसिद्ध कलाकारांचे इंटरव्यू, जाहिराती किंवा सार्वजनिक कार्यक्रमांचे व्हिडीओ घेतात. त्यातील ऑडिओ-व्हिज्युअल डेटा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने प्रोसेस करून त्या चेहऱ्यावर नव्या व्हिडीओतील गोष्टी चढवतात आणि व्हॉईस क्लोनिंग सॉफ्टवेअर वापरून त्यांचा आवाज तयार करतात. नंतर या बनावट आवाजातून 'मी ही नवी डायबिटीज कंट्रोल कॅप्सूल घेतली आणि फक्त तीन दिवसांत शुगर कमी झाली,' असे खोटे संदेश तयार केले जातात. हे व्हिडीओ नंतर व्हॉटस्ॲप, फेसबुक, यूट्यूबवर वायरल करून त्याखाली खरेदीसाठी लिंक्स आणि पेमेंट नंबर दिले जातात.या बनावट व्हिडीओंचा परिणाम एवढा प्रचंड असतो की, सामान्य लोकांनाही ते खरे वाटतात. व्हिडीओमध्ये काही ओळखण्याजोगे दोष दिसतात. उदाहरणार्थ, ओठांच्या हालचाली आणि आवाज यामध्ये थोडा फरक दिसतो, चेहऱ्याच्या किनाऱ्यांवर कृत्रिम धूसरपणा असतो, त्वचेवर अतिउजळपणा किंवा अनसैर्गिक चमक दिसते आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, असे व्हिडीओ कधीच त्या व्यक्तीच्या अधिकृत सोशल मीडियावर उपलब्ध नसतात. त्याचप्रमाणे या व्हिडीओंमध्ये नेहमीच 'आता ऑर्डर करा' किंवा व्हॉटस्ॲप नंबरवर संपर्क करा, अशा घाईच्या सूचना दिल्या जातात. प्रत्यक्षात कोणतीही प्रतिष्ठित कंपनी अशा पद्धतीने प्रचार करत नाही. त्यामुळे लोकांनी अशा व्हिडीओंकडे दुर्लक्ष करून कोणत्याही अज्ञात लिंकवर क्लिक करू नये, असा सायबर पोलिसांचा इशारा आहे. या बनावटपणाचे संकट आता केवळ भारतापुरते मर्यादित राहिलेले नाही, जगभरातील नामांकित शास्त्रज्ञ आणि सार्वजनिक व्यक्तिमत्त्वेही याचे बळी ठरत आहेत. अमेरिकेतील सुप्रसिद्ध सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ मिचियो काकू यांनी नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट करून इशारा दिला आहे की, त्यांच्या चेहऱ्याचा आणि आवाजाचा वापर करून दीपफेक व्हिडीओ तयार करण्यात आले आहेत. या व्हिडीओमध्ये त्यांच्या खऱ्या मुलाखतीतील क्लिप्स एडिट करून दाखवण्यात आले आहेत. त्यात असे भासवले गेले की, त्यांनी एका आंतरतारकीय धूमकेतूला एलियन यान म्हटले आहे. प्रत्यक्षात त्यांनी केवळ वैज्ञानिक अभ्यासासाठी पोग्य असे विचित्र गुणधर्म असल्याचे म्हटले होते. मिचियो काकू यांनी सांगितले की, हे डीपफेक व्हिडीओ त्यांचे विचार तोडूनमोडून सादर करत आहेत आणि लोकांमध्ये दिशाभूल घडवत आहेत. ब्रायन कॉक्स या ब्रिटिश शास्त्रज्ञाच्याही नावाने सायबर विश्वातील ठकसेनांनी एआयचा वापर करत बनावट व्हिडीओ तयार करून पैसे उकळण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. अनेक ठकसेन आता नेते, अभिनेते, डॉक्टर आणि प्रसिद्ध सेलिब्रिटी यांच्या बनावट व्हिडीओ आणि ऑडिओ क्लिप्स तयार करून त्यांच्यामार्फत औषधांच्या खोट्या जाहिराती प्रसारित करत आहेत.

## संपादकीय »

# बदलण्याची वेळ

***गतिक आरोग्य संघटनेच्या जा आकडेवारीनुसार, जगभरात प्रत्येक ४० सेकंदाला एक व्यक्ती आत्महत्या करते.***

साधारण दहा-बारा वर्षांपूर्वी विद्याध्यर्थ्यांच्या आत्महत्यांचा विषय राष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर चर्चेत आला होता. त्याची मीमांसा करताना परीक्षांमधील गुणपद्धती, परीक्षांची काठिण्य पातळी, अभ्यासाचे ओझे यांसारखे मुद्दे समोर आले आणि त्यानुसार शिक्षण प्रक्रियेत काही बदलही करण्यात आले. मध्यंतरीच्प काळात असंख्य राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी, नैसर्गिक आपत्ती, कोरोना महामारी आणि प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा मुद्दा मागे पडला, वास्तविक, गुणांक पद्धत जाऊन श्रेणी पद्धत आल्यानंतर आणि अनुत्तीर्णाचे प्रमाण कमी करण्याबाबत केलेल्या उपाययोजनांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख उंचावताना दिसून आला. दहावी-बारावीच्या निकालांचा टक्काही उंचावला. यामुळे शिक्षण क्षेत्रात सारे काही आलबेल आहे, असे चित्र निर्माण झाले.

बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळालेले घवघवीत यश अभूतपूर्व आणि ऐतिहासिक आहे. बहुतांश मतदानोत्तर चाचण्यांमधून बिहारी मतदारांचा कल स्पष्ट झाल्यामुळे हा निकाल काहीसा अपेक्षितच होता; परंतु तो रालोआसाठी अगदी महाराष्ट्रासारखा 'लैंडस्लाईड व्हिक्ट्री' ठरेल आणि विरोधकांची इतकी वाताहात होईल.

# बिहारचा चमत्कारी विजय !

स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने ३३०/३३० पैकी २३९ जागा जिंकल्या होत्या. स्वतंत्र भारताच्या पहिल्या शासनाचा उत्साह, कॉंग्रेसची राजकीय भूमिका आणि संघटनात्मक ताकद या सर्व गोष्टींचा मोठा वाटा होता. १९६२ च्या निवडणुकीत काँग्रेसने ३१८ पैकी १८५ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर १९७७ मध्ये जनता पक्षाने ३२४ पैकी २१४ जागा मिळवून प्रचंड विजय नोंदवला होता. हा विजय राष्ट्रीय व राज्यस्तरीय आणीबाणीच्या विरोधातील प्रतिक्रियांचा होता. १९८५ मध्ये पुन्हा काँग्रेसने ३२४ पैकी १९६ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते; परंतु मंडलीकरणाचे राजकारण सुरू झाले.

आणि बिहारमधील काँग्रेसचा जनाधार घटण्यास सुरुवात झाली. मध्यंतरीच्या काळात लालूराज आले; परंतु २०१० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत एनडीएने (मुख्यत्वे जेडीयू आणि भाजप एकत्रित) २४३ पैकी २०६



जागांपर्यंत मजल मारत बिहारमध्ये भक्कम बहुमत मिळवले होते. आज १५ वर्षांनंतर पुन्हा एकदा तितकेच दमदार यश मिळवल्यामुळे हा विजय ऐतिहासिक म्हणावा लागेल.

त्याचे दुसरे कारण म्हणजे नितीशबाबूंचा सत्ताकाळ, तब्बल ९ वेळा मुख्यमंत्रिपदी राहूनही एखाद्या नेत्याच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा इतका मोठा विजय मिळणे, ही भारतीय राजकारणातील दुर्मीळ बाब ठरते. फॅक्टर प्राधान्याने दिसून येत होता; परंतु २०१९ पासून 'प्रो-इन्कम्बसी' फॅक्टरची चर्चा देशात होऊ लागली. स्वतः पंतप्रधान मोदींनी याचा उल्लेख आपल्या अनेक सभांमध्ये केला आहे. स्वतः मोदी गुजरातमध्ये सलग २००१ ते २०१२ असे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेले आहेत. तो मान्य केला तरीही सलग २० वर्षे मुख्यमंत्रिपदावर राहूनही नितीशकुमारांचा बिहारच्या राजकारणातील करिष्मा आजही कायम आहे, हे या निकालांनी दाखवून दिले असून ही बाब अनन्यसाधारण आहे. या दोन दशकांमध्ये त्यांनी विविध गठबंधने केली. अलीकडील काळात त्यांच्या वयाबद्दलही बरीच चर्चा होऊ लागली होती. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रचारात विरोधकांकडूनही त्यांच्या वयाचे, आजारपणाचे मुद्दे वारंवार उपस्थित केले गेले, नितीशकुमार यांची काही भाषणांतील विसंगती या प्रश्नांना अधिक बळकटी देणारी ठरली होती. तसेच त्यांची लोकप्रियताही घटत चालल्याची चर्चा झाली. तथापि, एक्झिट पोलमध्ये एनडीएला मोठा विजय मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आल्यानंतर जेडीयू कार्यालयाबाहेर नितीशकुमार यांच्या प्रतिमेसह 'टायगर अभी जिंदा है' अशी घोषणा असलेले पोस्टर झळकले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## महिला खासदारांचे शोषण! सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याने वेधले लक्ष

# संसदेतही महिला खासदारांचे शोषण!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**समाजातील सर्व महिलांच्या समस्या सारख्याच असतात. संसदेत महिलांचे शोषण होत नाही, असे अनेकांना वाटते. मात्र, ते खरे नाही. संसदेतही महिला खासदारांचे शोषण होते. त्याचे प्रकार वेगवेगळे असतात. ते महाविद्यालयातील रॅगिंगसारखे नसते. व्यक्तिनुरूप त्याची व्याख्या बदलते. महिलांना साड्यांच्या रंगावरून दिलेल्या प्रतिक्रिया या देखील शोषणाचाच एक प्रकार आहे.**

## सर्व मोठे निर्णय पुरुषांनीच घेतले




## एआयचा सुरक्षित वापर

पुरुषांनी कामाच्या ठिकाणी व्यावसायिक पद्धतीचे वागणे ठेवायला हवे, असे ठाम मत राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी रविवारी व्यक्त केले.आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील महिला पत्रकारांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते.

महिलांकडून पुरुषांचे केस, कपडे याबाबत टिप्पणी केली जात नाही. मात्र, पुरुषांकडून सर्रासपणे केली जाते. पुरुषांनी कामाच्या ठिकाणी व्यावसायिक पद्धतीचे वागणे ठेवायला हवे, असे ठाम मत राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी रविवारी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील महिला पत्रकारांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उदघाटन सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.पुरुषांच्या चुकीच्या वृत्तीवर बोट ठेवताना सुळे यांनी त्यांच्या आयुष्यातील पुरुषांचे स्थानही अधोरेखित केले. माझ्या आयुष्यातील सर्व मोठे निर्णय पुरुषांनीच घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मताधिकार दिला. जोतिबा फुले यांनी पुढाकार घेतला तेव्हा सावित्रीबाई शिक्षित झाल्या. अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्रत्येक पुरुष वाईट नसतो, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, पत्रकार जसे समाजातील सर्व घटकांना पारदर्शकपणे न्याय देण्याचा प्रयत्न करतात, तसेच राजकीय पक्ष देखील सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. राज्यात, देशात फिरताना मला शौचालयांची संख्या वाढल्याचे दिसून येत नाही. आता २१ व्या शतकात देशात मोठे बदल झाले. मेट्रो, विमानतळे, रेल्वे आदी विविध मोठे प्रकल्प सुरु झाले आहेत. मात्र, शौचालयांसारखी मूलभूत सुविधाच पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसेल तर मोठमोठे प्रकल्प काय कामाचे, असा प्रश्न सुळे यांनी उपस्थित केला.तसेच, भारताची विविधतेतील एकता ही देशाचे सौंदर्य आणि ताकद आहे. पण सद्यस्थितीत तीच विविधता कमकुवतपणा ठरत आहे. नागरिकांनी विविधतेचा आदर राखायला हवा. एखाद्याला बोलण्याचा अधिकार असेल, तर ऐकून घ्यायचीही हिंमत असायला हवी, त्यालाच सशक्त लोकशाही म्हणतात, असेही सुळे म्हणाल्या.या संमेलनचा समारोप लोकसत्ताच्या फीचर एडिटर आरती कदम आणि सीएनबीसीच्या कन्सल्टिंग एडिटर लता व्यंकटेश यांचे मार्गदर्शन व अनुभवकथनाने झाला.संमेलनात पत्रकारिता, माध्यम क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. पत्रकारितेतील वरिष्ठ नेतृत्व पदांवर महिलांची मर्यादा, माध्यम क्षेत्रातील महिलांची वाढती संख्या, महिला पत्रकारांसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय, ज्येष्ठ महिला संपादक आणि पत्रकारांचे अनुभव, मार्गदर्शन, एआयचा सुरक्षित वापर आणि मीडिया व्यवसायातील नवीन दिशा, कामाच्या ठिकाणची कायदेशीर चौकटी आणि संरक्षण आदी सत्रे घेण्यात आली. त्यात ज्येष्ठ पत्रकार कल्पना शर्मा, संपादक राही भिडे, मृणालिनी नानिवडेकर, सुकन्या शांता, जान्हवी पाटील, प्राची कुलकर्णी, शिरीन दळवी, अरुंधती रानडे, मानसी फडके, विदुला टोकेकर, मुक्ता चैतन्य, प्रीती सोमपुरा, स्वाती नाईक, मोहिनी जाधव, सुकेशनी नाईकवडे आदींनी आपापले विचार मांडले. त्यांच्याशी संध्या नरे- पवार, रेखा शेळके, प्रगती बाणखेले, अलका धुपकर यांनी संवाद साधला.समाजातील सर्व महिलांच्या समस्या सारख्याच असतात. संसदेत महिलांचे शोषण होत नाही, असे अनेकांना वाटते. मात्र, ते खरे नाही. संसदेतही महिला खासदारांचे शोषण होते. त्याचे प्रकार वेगवेगळे असतात. ते महाविद्यालयातील रॅगिंगसारखे नसते. व्यक्तिनुरूप त्याची व्याख्या बदलते. महिलांना साड्यांच्या रंगावरून दिलेल्या प्रतिक्रिया या देखील शोषणाचाच एक प्रकार आहे.महिलांकडून पुरुषांचे केस, कपडे याबाबत टिप्पणी केली जात नाही. मात्र, पुरुषांकडून सर्रासपणे केली जाते.

# मानसिक आरोग्यासाठी युजीसीचा पुढाकार

## शैक्षणिक संस्थांमध्ये ‘टेलीमानस’चा होणार प्रसार...

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बदलत्या जीवनशैलीमुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वाढत असलेल्या मानसिक आरोग्य समस्यांबाबत जागृतीसाठी आणि विद्यार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय व विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) पावले उचलली आहेत. उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये ‘टेलीमानस’ या सुविधाचा वापर करण्याचे आदेश युजीसीने दिले आहेत.**



## अधिक दूरध्वनी या केंद्रांकडे आले

उपचार व मार्गदर्शन मिळावे यासाठी केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने १० ऑक्टोबर २०२२ रोजी दूरध्वनी-आधारित टेलीमानस सुविधा सुरू केली. या सुविधेला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. देशभरात ५३ केंद्रांच्या माध्यमातून आतापर्यंत २३ लाखांहून अधिक दूरध्वनी या केंद्रांकडे आले आहेत.

मानसिक ताण-तणावाखाली वावरणाऱ्या नागरिकांना सहज उपचार व मार्गदर्शन मिळावे यासाठी केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने १० ऑक्टोबर २०२२ रोजी दूरध्वनी-आधारित टेलीमानस सुविधा सुरू केली. या सुविधेला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. देशभरात ५३ केंद्रांच्या माध्यमातून आतापर्यंत २३ लाखांहून अधिक दूरध्वनी या केंद्रांकडे आले आहेत. २० भाषांमधून २४ तास ही सुविधा उपलब्ध असल्याने नागरिकांचा या सुविधेला प्रचंड प्रतिसाद आहे.वाढत्या गरजेनुसार आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने काही राज्यांमध्ये चित्रफितीच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून दिली. त्यानंतर या सेवेचा देशव्यापी विस्तार करण्यात आला आहे.

तसेच टेलीमानसचे इंग्रजी आणि हिंदी मोबाइल ॲपही सुरू करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्ममुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांना प्रत्यक्ष मानसिक आरोग्य तज्ज्ञांशी ऑनलाइन संवाद साधता येत आहे, विशेषतः दुर्गम भागांमध्ये हे मोठे सहाय्य ठरत आहे.सर्वसामान्य नागरिकांबरोबरच देशाचे भवितव्य असलेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक तणावातून बाहेर काढण्यासाठी आता यूजीसीने विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये टेलीमानस या सुविधेचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांचे संकेतस्थळ, माहिती पुस्तिका, समाजमाध्यमे आणि परिसरात डिजिटल फलकाच्या माध्यमातून टेलीमानसचा हेल्पलाईन क्रमांक १४४१६ आणि १८००९१४४७६ हा क्रमांक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावा. त्याचप्रमाणे ग्रंथालये, समुपदेशन केंद्रे, सूचना फलकांवर टेलीमानस मोबाईल ॲपचा क्यूआर कोड द्यावा, असेही यूजीसीकडून सांगण्यात आले आहे.

बिहारचा शपथविधी सोहळा

## नितीश कुमार हेच मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार का?

# बिहारच्या नवीन सरकारचा शपथविधी सोहळा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएला २०२ जागा जिंकता आल्या, तर महाआघाडीला फक्त ३५ जागा मिळवता आल्या आहेत. एनडीएला बहुमत मिळाल्यानंतर आता बिहारमध्ये पुन्हा एकदा एनडीएचं सरकार स्थापन होणार आहे. पण बिहारच्या नवीन सरकारचा शपथविधी सोहळा कधी होणार? बिहारचं मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. यावर आता केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी महत्वाची माहिती सांगितली आहे.**

## महाआघाडीला फक्त ३५ जागा



बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे राज्यातील सरकार स्थापनेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. भाजपा आणि नितीश कुमार यांचा जदयू हे पक्ष बिहारमध्ये सर्वात मोठे पक्ष म्हणून उदयास आले आहेत. त्यामुळे नितीश कुमार हेच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार का? की मुख्यमंत्री पदी दुसरी कोणाची वर्णी लागणार? यावर विविध चर्चा रंगताना पाहायला मिळत आहेत.केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी यासंदर्भात बोलताना म्हटलं की, "राज्यात नवीन एनडीए सरकार २२ नोव्हेंबरपूर्वी स्थापन होईल. मी वरिष्ठ केंद्रीय मंत्र्यांशी बोलेन आणि आज किंवा उद्यापर्यंत आमची ब्लू प्रिंट तयार होईल. मात्र, तरीही आपल्याला २२ नोव्हेंबरपूर्वी सरकार स्थापन करायचं आहे आणि ते केलं जाईल. सरकार स्थापनेबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल." या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.राष्ट्रीय लोक मोर्चाचे नेते उपेंद्र कुशवाह यांनीही सरकार स्थापनेबाबत प्रतिक्रिया दिली, ते म्हणाले की, "पुढील दोन ते चार दिवसांत गोष्टी स्पष्ट होतील. त्यामुळे लोकांना आणखी थोडी वाट पहावी लागेल. पण एनडीए सरकार स्थापनेची प्रक्रिया दोन ते तीन दिवसांत सुरू होईल. सर्व विजयी आमदार सध्या त्यांच्या मतदारसंघात आहेत, ते पटणामध्ये पोहोचले की पुढील सरकार स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल."भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्त्वाखालील एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली. बिहार निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. यामध्ये एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली. एनडीएने जिंकलेल्या २०२ जागांपैकी भाजपाला ८९ जागांवर विजय मिळाला, तर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाने ८५ जागा जिंकल्या. या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाने (रामविलास) लढवलेल्या २९ जागांपैकी १९ जागा जिंकल्या, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवाम मोर्चाने ५ जागा जिंकल्या तर राष्ट्र लोक मोर्चाने ४ जागा जिंकल्या. तसेच महाआघाडीला अवघ्या ३५ जागांवर समाधान मानावं लागलं. बिहार विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएला २०२ जागा जिंकता आल्या, तर महाआघाडीला फक्त ३५ जागा मिळवता आल्या आहेत. एनडीएला बहुमत मिळाल्यानंतर आता बिहारमध्ये पुन्हा एकदा एनडीएचं सरकार स्थापन होणार आहे. पण बिहारच्या नवीन सरकारचा शपथविधी सोहळा कधी होणार? बिहारचं मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत.बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे राज्यातील सरकार स्थापनेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. भाजपा आणि नितीश कुमार यांचा जदयू हे पक्ष बिहारमध्ये सर्वात मोठे पक्ष म्हणून उदयास आले आहेत. त्यामुळे नितीश कुमार हेच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार का? की मुख्यमंत्री पदी दुसरी कोणाची वर्णी लागणार? यावर विविध चर्चा रंगताना पाहायला मिळत आहेत.केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी यासंदर्भात बोलताना म्हटलं की, "राज्यात नवीन एनडीए सरकार २२ नोव्हेंबरपूर्वी स्थापन होईल. मी वरिष्ठ केंद्रीय मंत्र्यांशी बोलेन आणि आज किंवा उद्यापर्यंत आमची ब्लू प्रिंट तयार होईल. मात्र, तरीही आपल्याला २२ नोव्हेंबरपूर्वी सरकार स्थापन करायचं आहे आणि ते केलं जाईल. सरकार स्थापनेबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल.

## उपेंद्र कुशवाह काय म्हणाले?

राष्ट्रीय लोक मोर्चाचे नेते उपेंद्र कुशवाह यांनीही सरकार स्थापनेबाबत प्रतिक्रिया दिली, ते म्हणाले की, "पुढील दोन ते चार दिवसांत गोष्टी स्पष्ट होतील. त्यामुळे लोकांना आणखी थोडी वाट पहावी लागेल. पण एनडीए सरकार स्थापनेची प्रक्रिया दोन ते तीन दिवसांत सुरू होईल. सर्व विजयी आमदार सध्या त्यांच्या मतदारसंघात आहेत, ते पटणामध्ये पोहोचले की पुढील सरकार स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल."भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्त्वाखालील एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली.

# RJD २५ पेक्षा जास्त जागा जिंकणार नाही

## स्वतःचेच कपडे फाडणाऱ्या नेत्याची भविष्यवाणी अखेर खरी ठरली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीत तिकीट नाकारल्यानंतर लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचे नेते मदन शाह यांनी कपडे फाडून घेतले होते. त्यावेळी त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. आता बिहार विधानसभेच्या निकालानंतर मदन शाह यांनी रविवारी पक्षाच्या निवडणुकीतील पराभवामुळे वेदना होत असल्याचे म्हटले आहे.**

पक्षाचा पराभव झाला हे पाहून मला वाईट वाटले, पण देव जे करतो ते चांगल्यासाठीच करतो. यावेळी तिकिट वाटपाबाबत लालूजींशी सल्लामसलत करण्यात आले नव्हते", असे मदन शाह यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना म्हटले.यावेळी मदन शाह यांनी अशीही टिप्पणी केली की, त्यांनी "शाप" दिला होता की, राष्ट्रीय जनता दल या निवडणुकीत २५ पेक्षा जास्त जागा जिंकू शकणार नाही. निकालानंतर त्यांचे शब्द खरे ठरल्याचे दिसून येत आहे, कारण या निवडणुकीत महाआघाडीला ३५ तर राष्ट्रीय जनता दलाला २५ जागांवरच विजय मिळाला. निवडणुकीपूर्वीच्या घटनेचा उल्लेख करताना मदन शाह






म्हणाले की, त्यावेळी त्यांना खूप दुःख होते. त्यामुळे त्यांनी निराश होऊन स्वतःचे कपडे फाडले होते.तिकिटासाठी त्यांना २.७ कोटी रुपयांची मागणी केल्याच्या आरोपावर बोलताना मदन शाह यांनी स्पष्ट केले की, ही मागणी थेट त्यांना करण्यात आली नव्हती.भारतीय जनता पार्टी आणि संयुक्त जनता दलाच्या नेतृत्त्वाखालील एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली. बिहार निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. यामध्ये एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली.भारतीय जनता पार्टी आणि संयुक्त जनता दलाच्या नेतृत्त्वाखालील एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली. बिहार निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. यामध्ये एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली.एनडीएने जिंकलेल्या २०२ जागांपैकी भाजपाला ८९ जागांवर विजय मिळाला, तर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाने ८५ जागा जिंकल्या. या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या.

## अवाम मोर्चाने ५ जागा जिंकल्या

लढवलेल्या २९ जागांपैकी १९ जागा जिंकल्या, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवाम मोर्चाने ५ जागा जिंकल्या तर राष्ट्र लोक मोर्चाने ४ जागा जिंकल्या.बिहार विधानसभा निवडणुकीत तिकीट नाकारल्यानंतर लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचे नेते मदन शाह यांनी कपडे फाडून घेतले होते. त्यावेळी त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते.

# त्रिशा ठोसरला 'या' बॉलीवूड अभिनेत्रीबरोबर करायचंय काम!

बालकलाकार त्रिशा ठोसरला 'नाळ २' सिनेमासाठी यंदा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही चिमुकली पुरस्कार सोहळ्याला खास साडी नेसून गेली होती. त्रिशाच्या चेहऱ्यावरची निरागसता, तिचा आत्मविश्वास पाहून सगळेच भारावून गेले होते. तेव्हापासून त्रिशा संपूर्ण देशभरात चर्चेत आली. दाक्षिणात्य सुपरस्टार कमल हासन यांनीही त्रिशाला शुभेच्छा देण्यासाठी खास फोन केला होता. याशिवाय पुरस्कार सोहळ्यात शाहरुख खान, राणी मुखर्जी, विक्रांत मॅसी अशा अनेक बॉलीवूड स्टार्सना ही चिमुकली भेटली. त्रिशाला भविष्यात कोणत्या बॉलीवूड अभिनेत्रीबरोबर काम करण्याची इच्छा आहे? असा प्रश्न तिला नुकत्याच एका मुलाखतीत विचारण्यात आला. यावर या चिमुकलीने आलिया भट्टचं नाव घेतलं आहे. त्रिशा नेमकं काय म्हणाली जाणून घेऊयात... "मला आलिया भट्ट खूप आवडतात. कारण, मी त्यांचा एक सिनेमा पाहिला होता...झुमका गिरा रे ( रॉकी और रानी की प्रेम कहानी ). जर, मला त्या भेटल्या तर मी त्यांना नक्की सांगेन की...मी तुमचा सिनेमा पाहिला होता. मला तो खूप आवडला आणि मला तुमच्याबरोबर काम करायचं आहे." असं त्रिशाने लोकशाही फ्रेंडलीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.याशिवाय काही दिवसांपूर्वी 'लोकसत्ता ऑनलाइन'ला दिलेल्या मुलाखतीत त्रिशाला तुझे फेव्हरेट अभिनेते कोण



आहेत? असा प्रश्न विचारला गेला होता. हा प्रश्न ऐकताच त्रिशाने लगेच 'रितेश देशमुख'चं नाव घेतलं. तिचं उत्तर ऐकून उपस्थित सगळेजण फार खूश झाले. यावर "याला म्हणतात मराठी बाणा!" असं म्हणत महेश मांजरेकरांनी त्रिशाचं कौतुक केलं होतं.दरम्यान, ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये यंदा मराठी सिनेविश्वातील बालकलाकारांनी बाजी मारल्याचं पाहायला मिळालं. सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा रजत कमळ पुरस्कार यंदा 'जिप्सी' या मराठी चित्रपटासाठी कबीर खंदारे याला आणि 'नाळ २'साठी त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप यांना विभागून प्रदान करण्यात आला. यांच्यात त्रिशा वयाने सर्वात लहान होती. नुकतीच ती महेश मांजरेकर दिग्दर्शित 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिनेमात झळकली होती.

बालकलाकार त्रिशा ठोसरला 'नाळ २' सिनेमासाठी यंदा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही चिमुकली पुरस्कार सोहळ्याला खास साडी नेसून गेली होती. त्रिशाच्या चेहऱ्यावरची निरागसता, तिचा आत्मविश्वास पाहून सगळेच भारावून गेले होते. तेव्हापासून त्रिशा संपूर्ण देशभरात चर्चेत आली. दाक्षिणात्य सुपरस्टार कमल हासन यांनीही त्रिशाला शुभेच्छा देण्यासाठी खास फोन केला होता. याशिवाय पुरस्कार सोहळ्यात शाहरुख खान, राणी मुखर्जी, विक्रांत मॅसी अशा अनेक बॉलीवूड स्टार्सना ही चिमुकली भेटली. त्रिशाला भविष्यात कोणत्या बॉलीवूड अभिनेत्रीबरोबर काम करण्याची इच्छा आहे?

## शहाणेंनी मातृत्वाबद्दल व्यक्त केल्या भावना

आपल्या मनमोहक हास्याने सर्वांना भुरळ घालणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणून रेणुका शहाणेंना ओळखलं जातं. 'हम आपके हैं कौन' या सिनेमाचं नाव जरी घेतलं तरी त्यांची आणि माधुरी दीक्षितची जोडी डोळ्यासमोर उभी राहते. मराठीसह हिंदी कलाविश्व गाजवणाऱ्या या गुणी अभिनेत्रीने वैयक्तिक आयुष्यात २००१ मध्ये अभिनेते आशुतोष राणांशी लग्न केलं. या जोडप्याला दोन मुलं आहेत. त्यांच्या मुलांची नावं शौर्यमन राणा व सत्येंद्र राणा अशी आहेत. नुकत्याच 'आरपार'ला दिलेल्या मुलाखतीत रेणुका शहाणे म्हणाल्या, "माझी वेगळी काही स्वप्न नव्हतीच. लहानपणापासून मला मुलं हवीच होती. लोक मला जेव्हा माझं उद्दिष्ट विचारायचे तेव्हा मी सांगायचे मला मुलं हवी आहेत. खरंच हीच माझी मनापासून इच्छा होती. कारण, कामाच्या बाबतीत सांगायचं झालं तर सगळ्या गोष्टी करिअरमध्ये आपोआप घडत गेल्या. जे-जे काम आलं ते मी करत गेले.

## मेघन अनुष्का लग्नबंधनात

मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता मेघन जाधव व अभिनेत्री अनुष्का पिंपुटकर आज ( १६ नोव्हेंबर ) लग्नबंधनात अडकले आहेत. त्यांच्या लग्नसोहळ्याची गेल्या काही दिवसांपासून चाहते आतुरतेने वाट पाहत होते. काही दिवसांपूर्वीच 'लक्ष्मी निवास'च्या टीमने या दोघांचं थाटामाटात केळवण केलं होतं. आता 'अनुमेघ' ( अनुष्का व मेघन ) आयुष्यभराचे जोडीदार झाले आहेत. यांच्या लग्नसोहळ्यातील पहिला फोटो नुकताच समोर आला आहे. अनुष्का व मेघन या दोघांनीही लग्नसोहळ्यात पारंपरिक लूक केला होता. अनुष्का गुलाबी रंगाच्या नऊवारी साडीत खूपच सुंदर दिसत होती. सुंदर साडी, गळ्यात सुंदर हार, हातात मॅचिंग बांगड्या, नाकात नथ असा लूक अनुष्काने केला होता. तर, मेघनने लग्नसोहळ्यात शेरवानी घातल्याचं पाहायला मिळत आहे.अनुष्का व मेघन यांची भेट 'रंग माझा वेगळा' या मालिकेच्या निमित्ताने झाली. पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं आणि वर्षभराने मेघनने त्यांच्या नात्याविषयी घरी सांगितलं होतं. हर्षदा खानविलकर या दोघांविषयी म्हणतात, "हा माझा जावई आहे...आमच्या शोमध्ये ( रंग माझा वेगळा ) हा आमचा जावई होता. 'रंग माझा वेगळा'मध्ये हे दोघं भेटले, मैत्री झाली आणि तेव्हा खरंच वाटलं नव्हतं की असं काही असेल. शो संपताना आमच्या लक्षात आलं की ओह...असं काहीतरी आहे. आज मला या दोघांसाठी खूप-खूप छान वाटतंय."मेघन व अनुष्का गेली अडीच वर्षे रिलेशनशिपमध्ये आहेत. काही दिवसांपूर्वीच या दोघांनी सोशल मीडियावर प्रेमाची जाहीर कबुली देत लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याचं जाहीर केलं होतं. आज त्यांचा लग्नसोहळा थाटामाटात पार पडला आहे.



## 'दास्तानगोई' हा कलाप्रकार भारतात कुठून आला?

अक्षय शिंपी या अभिनेत्याने त्याची सहकारी अभिनेत्री नेहा कुलकर्णी हिच्या साथीने 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट'मध्ये 'दास्तान-ए-रामजी' या त्याच्या 'दास्तानगोई'चा (कथाकथन) प्रयोग सादर केला. यावेळी त्याने या कथन कलाप्रकाराची सुरुवात कशी झाली? हा कलाप्रकार भारतात कसा आला? आणि कसा रुजला? याबाबतची तथ्ये उलगडून सांगितली. हा अभिनेता लखनौमध्ये दास्तानगोई या उर्दूमधील पारंपरिक कथाकथन प्रकाराच्या संपर्कात आला आणि त्या प्रकाराने त्याला झपाटले. एकाच विषयाच्या धाग्यात विणलेल्या छोट्या छोट्या अनेक कथा व कविता असलेल्या आपल्या "दास्तान-ए-बड़ी बांका" या पहिल्या प्रयोगाद्वारे त्याने दास्तानगोई हा प्रकार मराठीत आणला आणि आता तो 'दास्तान-ए-रामजी'च्या माध्यमातून प्रेक्षकांना भेटत आहे.अक्षय शिंपी म्हणाला, "मी 'दास्तान-ए-रामजी' हा कथन कलाप्रकार सादर करतोय. मुळात दास्तान हा मूळचा फारसी शब्द आहे. याचा अर्थ कथा असा होतो आणि गोई म्हणजे सांगणे, मांडणे किंवा ऐकवणे, यामुळे दास्तानगोई म्हणजे स्टोरीटेलिंग, कथा सादर करणे किंवा कथा ऐकवणे, कथाकथन करणे असा अर्थ होतो. एका संशोधनानुसार हा कथन कलाप्रकार भारतात पर्शियामधून आला. तर, आणखी एक संशोधन असं सांगतं की हा कलाप्रकार इथेच जन्माला आला आहे. मात्र एकट्या भारतात हा कलाप्रकार जन्मलेला नसून एकाच वेळी तीन ठिकाणी हा कथन कलाप्रकार तयार झाला आहे.""तीन प्रदेशात एकाच एका आकृतीबंधाची गोष्ट समांतर पद्धतीने सांगितली गेली. भारतात 'बृहत्कथासरीतागर' हा प्रकार जन्माला येत होता. तर, त्याचवेळी पर्शियामधून 'दास्तान-ए-हमजा' हा प्रकार आला. दुसऱ्या बाजूला अरबस्तानात 'अरेबियन नाइट्स' सांगितली गेली. एक हजार गोष्टींचा प्रयोग. यामधील कथा, परिवेश, पात्र, भाषा आणि इतर सर्वकाही वेगळं होतं.

## 'लक्ष्मी निवास'फेम सिद्धूच्या वहिनीचा बोल्ड अंदाज!

'लक्ष्मी निवास' या कौटुंबिक मालिकेला प्रेक्षकांची भरभरून पसंती मिळत असल्याचं पाहायला मिळत आहे. या मल्टिस्टारर मालिकेत अनेक दमदार कलाकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. हर्षदा खानविलकर, अक्षया देवधर, तुषार दळवी, दिव्या पुगावकर, मेघन जाधव, कुणाल शुक्ल या सगळ्याच कलाकारांनी प्रेक्षकांची मनं जिंकून घेतली आहेत. नुकताच या मालिकेने ३०० भागांचा टप्पा ओलांडला यानिमित्ताने 'झी मराठी'ने खास पार्टीचं आयोजन केलं होतं. या सेलिब्रेशनला मालिकेतील सगळेच कलाकार उपस्थित होते. 'लक्ष्मी निवास' मालिकेतील कलाकार या पार्टीला खास वेस्टर्न लूक करून पोहोचले होते. भावना आणि जान्हवी ब्लॅक वनपीस घालून या पार्टीला पोहोचल्या होत्या. या दोघीही खूपच सुंदर दिसत होत्या. याशिवाय मालिकेतील काही कलाकारांचे कुटुंबीय सुद्धा या पार्टीला उपस्थित होते. याचबरोबर आणखी एका अभिनेत्रीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं तिचं नाव आहे कल्याणी जाधव. अभिनेत्री कल्याणी जाधव 'लक्ष्मी निवास' या मालिकेत निलांबरी अधिराज गाडेपाटील ही भूमिका साकारत आहे. निलांबरी ही सिद्धूची वहिनी असते. मालिकेत गाडेपाटील घराण्याला साजेसा असा निलांबरीचा पेहराव असतो. भरजरी साडी, सोन्याचे दागिने, केसांचा अंबाडा किंवा वेणी घातलेली असते. निलांबरी मालिकेत नेहमी सिद्धू-भावना विरोधात कटकारस्थानं करताना दिसते. मात्र, मालिकेत नेहमी साडीत अन् सोज्वळ अंदाजात दिसणारी निलांबरी प्रत्यक्षात मात्र एकदम बिनधास्त आणि बोल्ड आहे.'लक्ष्मी निवास' मालिकेच्या पार्टीला निलांबरी लाल रंगाचा शॉर्ट बॉडीकॉन वनपीस घालून पोहोचली होती. मालिकेतील अधिराज गाडेपाटीलसह तिने रेड कार्पेटवर एन्ट्री घेतली.



## सामना नेमका कुठे फिरला? ऋषभ पंतने सांगितला सामन्यातील ‘टर्निंग पॉईंट’

# टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव!

## टीम इंडियाचं नेमकं काय चुकलं?




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या पहिल्या कसोटी सामन्याचा शेवट असा होईल, असा कोणी विचारही केला नसेल. या सामन्याचा निकाल अवघ्या अडीच दिवसात लागला. पुन्हा एकदा भारतीय फलंदाज मायदेशात खेळताना फिरकी गोलंदाजांविरूद्ध संघर्ष करताना दिसून आले. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १२४ धावा करायच्या होत्या. एकापेक्षा एक स्टार फलंदाज असलेल्या भारतीय फलंदाजीक्रमासाठी हे आव्हान फार नव्हतं. पण भारतीय संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ३५ षटकात ९३ धावांवर आटोपला.**

दक्षिण आफ्रिकेचा फिरकीपटू सायमन हार्मर दोन्ही डावात भारतीय फलंदाजांवर भारी पडला. दोन्ही डावात मिळून त्याने ८ गडी बाद केले. यासह सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने पहिल्या डावात सर्वाधि ५ गडी बाद केले होते. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना रवींद्र जडेजाने सर्वाधिक ४ गडी बाद केले. दोन्ही संघातील गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली, पण फलंदाजांना हवं तितकं योगदान देता आलं नाही.या सामन्यातील ४ डावात मिळून अवघ्या ५९४ धावा बनल्या. ही भारतात कसोटी क्रिकेट खेळताना संयुक्तरित्या सर्वात कमी धावसंख्या आहे. याआधी २००४ मध्ये वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात चारही डावात मिळून ६०४ धावा बनवल्या गेल्या होत्या. त्यावेळी भारत आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्याचा निकाल अवघ्या तिसऱ्या दिवशी लागला होता. पण भारतीय संघाने या सामन्यात ऑस्ट्रेलियावर १३ धावांनी विजय मिळवला होता.या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव अवघ्या १५९ धावा संपुष्टात आला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला अवघ्या १८९ धावा करता आल्या. यासह भारतीय संघाने पहिल्या डावात अवघ्या ३० धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेचे सुरूवातीचे ७ फलंदाज स्वस्तात माघारी परतले होते. पण त्यानंतर कॉर्बिन बॉश आणि तेंबा बावुमा यांनी मिळून संघाची धावसंख्या १५३ धावांवर पोहोचवली. भारताला हा सामना जिंकण्यासाठी १२४ धावा करायच्या होत्या.

या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव ९३ धावांवर आटोपला. यासह दक्षिण आफ्रिकेने हा सामना ३० धावांनी आपल्या नावावर केला.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाला दारूण पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारतीय संघाकडे सहज विजय मिळवण्याची संधी होती. पण दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी करून भारतीय संघाच्या तोंडचा घास पळवला. अवघ्या १२४ धावांचा पाठलाग करत असलेला भारतीय संघाचा डाव ९३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारतीय संघाला हा सामना ३० धावांनी गमवावा लागला. दरम्यान सामना झाल्यानंतर गिलच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचं नेतृत्व करत असलेल्या ऋषभ पंतने पराभवाचं नेमकं कारण सांगितलं आहे. सामन्यानंतर बोलताना ऋषभ पंतने पराभवाचं कारण सांगत, सामना नेमका कुठे फिरला याबाबत भाष्य केलं. तो म्हणाला, “अशा सामन्याबद्दल जास्त विचार करत बसण्यात काहीच अर्थ नाही. आम्ही हे लक्ष्य सहज पूर्ण करायला हवं होतं. दुसऱ्या डावात आमच्यावरील दबाव आणखी वाढत गेला. त्यामुळे आम्ही संधीचा फायदा घेऊ शकलो नाही.” असं पंत म्हणाला.सामन्यातील टर्निंग पॉईंटबद्दल बोलताना पंत म्हणाला, “तेंबा आणि बॉशने महत्वपूर्ण भागीदारी केली. या भागीदारीमुळे ते सामन्यात परतले आणि हाच या सामन्यातील टर्निंग पॉईंट ठरला. खेळपट्टीतून मदत मिळत होती. १२० धावसंख्याही धोकादायक ठरू शकते. पण एक संघ म्हणून आम्ही हा दबाव पचवून संधीचं सोनं करायला हवं होतं.”या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

### भारताच्या पराभवाची कारणं

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव अवघ्या १५९ धावांवर आटोपला. भारतीय संघाकडून जसप्रीत बुमराह हिरो ठरला होता. त्याने या डावात गोलंदाजी करताना ५ गडी बाद केले होते. त्यानंतर पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघालाही हवी तशी कामगिरी करता आली नाही. भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या १८९ धावांवर आटोपला. भारतीय संघाला पहिल्या डावात ३० धावांची आघाडी मिळाली.

## वैभव सूर्यवंशीच्या एका चुकीने फिरले सामन्याचे पारडे!

# माझ सदाकतला मिळालेले ‘जीवदान’ ठरले भारतासाठी घातक



। दोहा ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यात एका क्षणाने चित्र पालटले आणि सामन्याचे पारडे पाकिस्तानच्या बाजूने झुकले. भारताचा तरुण खेळाडू वैभव सूर्यवंशीने दमदार फलंदाजी करत संघाला भक्कम सुरुवात करून दिली होती. परंतु क्षेत्ररक्षणात त्याच्याकडून झालेली एक मोठी चूक अखेरीस भारताच्या पराभवाचे मुख्य कारण ठरली.**

भारताने प्रथम फलंदाजी करताना वैभवने २८ चेंडूत ४५ धावा करत संघाला तिसऱ्या क्रमांकावरून मजबूती दिली. पहिल्याच चेंडूवर चौकार, त्यानंतर चौकार-षटकारांचा वर्षाव करत त्याने सामना भारताच्या पकडीत असल्याचा आभास निर्माण केला. त्याच्या खेळीत तीन षटकार आणि पाच चौकारांचा समावेश होता. मात्र, वैभव बाद झाल्यानंतर भारतीय डाव अक्षरशः ढासळला. पुढील ३५ धावांत सात गडी तंबूत परतले आणि भारताला अपेक्षित मोठी धावसंख्या उभारता आली नाही. परंतु भारतासाठी खरी घातक ठरलेली घटना घडली ती आठव्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर. भारताचा फिरकीपटू सुयश शर्मा गोलंदाजी करत होता. त्याच्या गुगलीचा अंदाज पाकिस्तानचा सलामीवीर माझ सदाकत लावू शकला नाही. ५३ धावांवर खेळणाऱ्या सदाकतचा फटका उंच गेला आणि चेंडू आकाशात बराच वेळ थांबल्याने तो सहज झेल ठरू शकला असता. वैभव सूर्यवंशी त्या झेलासाठी अगदी योग्य ठिकाणी उभा होता. चेंडू त्याच्या हातात आला, पण पुढच्याच क्षणी तो हातातून निसटला आणि थेट जमिनीवर पडला.

### सदाकत संघाच्या विजयाचा हिरो

हा झेल सुटल्याने माझ सदाकतला मिळालेले ‘जीवदान’ पाकिस्तानसाठी जणू वरदान ठरले. त्यानंतर त्याने भारतीय गोलंदाजांना चांगलेच छेडत नाबाद ७९ धावा ठोकल्या आणि पाकिस्तानला विजय मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावली. हा टप्पा सामना भारताच्या हातातून निसटण्याचा सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला. भारतीय संघाच्या समर्थकांना वैभवच्या झेल सुटण्याची चूक चांगलीच महागात पडली. फलंदाजीत चमक दाखवल्यानंतरही क्षेत्ररक्षणातील ही एक चूक संपूर्ण सामन्याचा निकाल उलटवून गेली. क्रिकेटमध्ये प्रत्येक चेंडू महत्त्वाचा असतो, हे या सामन्यात पुन्हा एकदा सिद्ध झाले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। सोमवार।

। दि. 17 नोव्हेंबर 2025।

### पुणे जिल्हा परिषद- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा

# मुलींचा जिल्हा क्रिकेट स्पर्धेत दबदबा!

## शिक्षण विश्व : एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या मुलींचा प्रथम क्रमांक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे जिल्हा परिषद आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलींच्या गटाने प्रथम क्रमांक मिळविला**




अंतिम सामन्यांमध्ये रहाटणी येथील एसएनबीपी स्कूलच्या संघावर ७३ धावा व दहा गडी राखून विजय मिळवून विभागीय स्पर्धेसाठी प्रवेश निश्चित केला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विजयी संघामध्ये अनघा आहेर, श्रेया तरस, आस्था टाक यांनी उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजी करत उत्तम कामगिरी केली.

या जिल्हास्तरीय १७ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत एकूण ४३ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक अरुण कडूस, स्पर्धा प्रमुख ऐश्वर्या साठे, सुनिता पालवे आदी उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापक शुभांगी कुलकर्णी, क्रीडा शिक्षक चंद्रकांत ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजयी संघाच्या मुलींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

---

### शालेय ॲक्रोबॅटीक स्पर्धेत एस. बी. पाटील पब्लिक स्कूल प्रथम

## शिक्षण विश्व: नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत निवड

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड:पुणे विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या मुलांनी ॲक्रोबॅटीक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. आदित्य खाडे, अनय पवार, राजवीर अजूरे आणि पवन खैरवार यांचा विजयी संघामध्ये समावेश होता.**



या विजयामुळे या संघाची निवड नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत झाली आहे.

कर्वेनगर, पुणे येथे झालेल्या या पुणे विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत स्पर्धेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पुणे ग्रामीण, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर ग्रामीण, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर ग्रामीण येथील विविध शालेय संघांनी सहभाग घेतला होता.

याच ॲक्रोबॅटीक स्पर्धेत एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या आर्या थोरात, वैदेही निकम, वीरा काटकर, यांनी मुली ट्रायो गटामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच ओम पाटील, सावनी बडवे यांनी मिश्र जोडी मध्ये द्वितीय क्रमांक आणि अमित कोडगाणुरा आणि रुद्र जंगलीवाड यांनी मुलांच्या जोडी मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्य पद्मावती बंडा, क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पीसीईटी चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## अग्निशमन विभागाच्या पथकाने आग त्वरित आणली नियंत्रणात

# पिंपरीत धावत्या पीएमपीएमएल बसला आग!

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे 15 प्रवासी सुरक्षित बाहेर




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरीतून भोसरीकडे निघालेल्या पीएमपीएमएलच्या बसला आज सकाळी पावणे बाराच्या सुमारास पिंपरी चौकाजवळील कामगार भवनासमोर बसला अचानक आग लागली . पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पिंपरी येथील पथकाने घटनास्थळी त्वरित धाव घेत ही आग नियंत्रणात आणली आहे. या घटनेत बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी बस चालकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व १५ प्रवासी सुरक्षित बाहेर पडल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.**

पीएमपीएमएलची बस पिंपरीतून भोसरीच्या दिशेने रविवारी सकाळी निघाली. या बसने महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचा थांबा घेतल्यानंतर ती नेहरूनगरच्या दिशेने रवाना झाली. लोखंडे कामगार भवनासमोर आल्यावर बसच्या इंजिनमधून धूर निघत असल्याचे बसचालकाच्या लक्षात आले. यावेळी चालकाने प्रसंगावधान राखत बसचे दरवाजे उघडले आणि त्यानंतर प्रवाशांना धोक्याची सूचना देत सर्वांना खाली उतरवले. या बसमध्ये चालक, वाहक यांच्यासह १५ प्रवासी होते.

अग्निशमन विभागाला बसने पेट घेतल्याची माहिती मिळताच मुख्यालयातून त्वरित अग्निशमन विभागाचे पथक रवाना करण्यात आले. पथकाने घटनास्थळी पोहोचताच प्रथम सुरक्षेच्या दृष्टीने परिसर रिकामा करून आगीवर नियंत्रण मिळवले. आग बसच्या इंजिन भागात पसरल्यामुळे काही मिनिटांत आगीने रौद्ररूप धारण केले होते. तथापि प्रशिक्षित जवानांनी या आगीवर ताबडतोब नियंत्रण मिळवत ती पूर्णपणे विझवली.या घटनेच्या वेळी परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. अग्निशमन दल आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्तरीत्या मार्ग मोकळा केला व परिस्थिती नियंत्रणात आणली.

घटनास्थळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी भेट देऊन माहिती घेतली. तर पथकामध्ये अग्निशमन विभागाचे उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, लीडिंग फायरमन शहाजी कोपनर, यंत्रचालक मयूर कुंभार, जवान अतुल मोरे, प्रकाश गव्हाने, पूजा वालगुडे, ओंकार गंगाड, हर्षल पवार, महेश गरड, सरिता जामणेकर आणि वैभव सोनवणे यांचा समावेश होता.

### तर अग्निशमन विभागाला कळवा

वाहनांमध्ये धूर किंवा अनैसर्गिक आवाज जाणवल्यास त्वरित वाहन थांबवून सुरक्षा पाळावी तसेच अशा प्रसंगी तात्काळ १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

### घटनास्थळाचे तपशील

**घटना :** पीएमपीएमएल बसला अचानक आग
**वेळ :** पावणे १२ वाजता
**ठिकाण :** पिंपरी चौक, कामगार भवनासमोर
**बसचा मार्ग :** पिंपरी - भोसरी
**एकूण प्रवासी :** १५ (सर्व सुरक्षित)
**हानी :** बसचे मोठे नुकसान
**जीवितहानी :** नाही



" अग्निशमन विभागाच्या जवानांनी दाखवलेली तत्परता, आणि जलद प्रतिसादामुळे आग पसरू शकली नाही आणि मोठा अनर्थ टळला. या आगीचे कारण अद्याप समोर आले नाही. आमच्या संपूर्ण पथकाने केलेली कामगिरी प्रशंसनीय आहे.

**-प्रदीप जांभळे पाटील,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

" आग लागल्याच्या घटनांमध्ये प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असतो. तात्काळ संदेश मिळताच आमचे पथक घटनास्थळी पोहोचले व परिस्थिती नियंत्रणात आणली. नागरिकांच्या सुरक्षिततेला आमचे प्राधान्य असून योग्य प्रशिक्षण व उपकरणांच्या मदतीने मोठी दुर्घटना टळली.

**—संदीप खोत,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

" आग लागल्याची वर्दी मिळताच आमचे अग्निशामक पथक तात्काळ घटनास्थळाकडे रवाना झाले. सर्वप्रथम बसमध्ये कोणीही अडकलेले नाही, याची खात्री करण्यात आली. कारण नागरिकांची सुरक्षा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. बसच्या इंजिन परिसरात ऑईल असल्याने त्या भागातील ज्वाळांची तीव्रता जास्त असल्यामुळे तथा सीएनजी गॅसने पेट घेतला असता तर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता होती. पथकातील सर्वांनी समन्वयाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने काम करत काही मिनिटांतच आगीवर नियंत्रण आणण्यास यश मिळवले.

**-ऋषिकांत चिपाडे,**
अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

### कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांची यशस्वी मध्यस्थी

# सेवा विकास बँकेतील कर्मचाऱ्यांची बेकायदेशीर कपात!

## सहाय्यक कामगार आयुक्तांकडून कामावर परतण्याचे आदेश



।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंतभाऊ भोसले यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, गेल्या तीन वर्षांपासून बँकेचे नियमित कामकाज थांबले असून फक्त कर्ज वसुलीचे काम सुरू आहे. कर्मचाऱ्यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये बेकायदेशीररित्या सेवा समाप्तीची नोटिस दिली गेल्याचा आरोप केला आहे.**

भोसले यांनी नमूद केले की, बँक अचानक बंद करताना कोणतीही वैध कारणे सांगितली गेली नाहीत आणि महाराष्ट्र शासनाकडून बँक बंद करण्याची किंवा मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची कपात करण्याची कोणतीही मान्यता घेतलेली नाही. या कारणास्तव २०५ कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिक संकटात आहेत. काही कर्मचाऱ्यांनी मानसिक तणावामुळे आत्महत्या आणि हृदयविकाराचा झटका यांसारख्या गंभीर परिणामांचा सामना केला आहे.

पत्रकार परिषदेत उपस्थित कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेवर नियुक्त LIQUIDATOR यांनी "बँक लवकरच सुरू होईल व देणी दिली जातील" अशी आश्वासने दिली होती, पण तक्रार केल्यास नुकसान होईल असा दबावही निर्माण केला होता. परिणामी, कर्मचारी कामगार कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यास घाबरत होते. कामगार संघटना 'राष्ट्रीय श्रमिक आघाडी'च्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी औपचारिक तक्रार दाखल करण्याचे अधिकार दिले आहेत आणि कामगार कार्यालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय व उच्च न्यायालयात आवश्यक त्या कायदेशीर प्रक्रिया राबवण्याची तयारी दर्शविली आहे.

सहाय्यक कामगार आयुक्तांच्या आदेशानुसार, बँक पुन्हा सुरू केली जाईल व LIQUIDATOR कडून कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याची पत्रव्यवस्था पूर्ण केली गेली आहे. कर्मचारी कामावर रुजू झाले असल्याने LIQUIDATOR च्या आदेशांची कार्यवाही अडथळ्याचा सामना करत आहे. बेकायदेशीर कर्मचाऱ्यांची कपात आणि बँकेचे बेकायदेशीर बंद होणे या प्रकरणात LIQUIDATOR व कामगार कार्यालय यांच्यात फौजदारी कारवाई होऊ शकते. शहरातील सर्व लक्ष आता या प्रकरणाकडे लागले आहे.

> "मागील तीन वर्षांपासून बँकेचे नियमित कामकाज बंद असून केवळ कर्ज वसुलीचे काम सुरू आहे. दीर्घकाळ सेवा बजावलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२२ मध्ये बेकायदेशीररित्या सेवा समाप्तीची पत्रे देण्यात आली. बँक अचानक बंद करताना कोणतीही वैध कारणे सांगितली गेली नाहीत आणि महाराष्ट्र शासनाकडून बँक बंद करण्याची किंवा मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची कपात करण्याची कोणतीही मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे २०५ कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिक संकटात आहेत. काही कर्मचाऱ्यांनी मानसिक तणावामुळे आत्महत्या आणि हृदयविकाराचा झटका यांसारख्या गंभीर परिणामांचा सामना केला आहे."
> - यशवंतभाऊ भोसले, कामगार नेते.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# जेजुरीत देवसंस्थान भूमिपूजनाबाबत ग्रामस्थांचा विरोध

## पोलीस ठाण्यात निवेदन : आचारसंहिता काळात धार्मिक कार्यक्रमामुळे सामाजिक तणाव

।जेजुरी : महाईन्यूज

**कुलदैवत खंडेरायाच्या मंदिर गडकोट अवताराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त समितीने शनिवारी होळकर तलावाजवळील स्वतःच्या मालकीच्या जागेत बहुउद्देशीय इमारत व भक्तनिवास यांच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन केले असताना ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला. सध्या निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात धार्मिक कार्यक्रम घेऊ नयेत, असा तक्रार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.**



ग्रामस्थ, मानकरी, खांदेकरी, सेवेकरी, पुजारी आणि माजी विश्वस्तांच्या वतीने पोलीस ठाण्यात निवेदन देत विश्वस्तांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, बहुतांश विश्वस्त राजकीय पक्षाशी निगडित असल्याने आचारसंहिता काळात हा कार्यक्रम घेणे योग्य नाही.

सन २०२२ मध्ये तत्कालीन विश्वस्त मंडळाने होळकर तलावाजवळ अत्याधुनिक रुग्णालयासाठी जागा खरेदी केली होती, जेथे गोरगरीब आणि सामान्य नागरिकांना अल्प दरात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा उद्देश होता. मात्र सध्या कार्यरत असलेल्या विश्वस्त मंडळाने पुणे धर्मादाय आयुक्तांचे आदेश घेऊन उद्देश बदलत भक्तनिवास व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचा निर्णय घेतला.

ग्रामस्थ मंडळाला विश्वासात न घेता आचारसंहिता काळात घाईघाईने भूमिपूजन करण्याचा प्रयत्न झाल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. याप्रकरणी माजी प्रमुख विश्वस्त सुधीर गोडसे, संदीप जगताप, शिवराज झगडे, नितीन राऊत, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणेपाटील, सचिव छबन कुदळे, प्रमुख मानकरी बळवंत पेशवे, रोहन पेशवे इनामदार, रोहिदास जगताप, प्रसाद वासकर, सचिन सोनवणे, हेमंत सोनवणे, अजिंक्य देशमुख, अक्षय दरेकर, शाम दरेकर आदी ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात निवेदन दिले आणि विश्वस्तांशी चर्चा केली. ग्रामस्थांनी ठामपणे सांगितले की, ज्या उद्देशासाठी जागा खरेदी केली आहे, त्यासाठी प्राधान्याने रुग्णालय उभारले जावे. निवडणूक झाल्यानंतर ग्रामस्थ मंडळासह बैठक घेऊन नंतरच सर्व निर्णय घेतले जावेत, असा आग्रह त्यांनी धरला. या चर्चेनंतर विश्वस्त मंडळाने ग्रामस्थांच्या मागणीला प्रतिसाद दिला आणि संभाव्य वाद टळला.

### मूळ उद्देश विसरला...?

सन २०२२ मध्ये तत्कालीन विश्वस्त मंडळाने होळकर तलावाजवळ अत्याधुनिक रुग्णालयासाठी जागा खरेदी केली होती, जेथे गरीब आणि सामान्य नागरिकांना अल्प दरात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, असा उद्देश होता. सध्याचे विश्वस्त मंडळ या उद्देशाऐवजी भक्तनिवास व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचा निर्णय घेऊन ग्रामस्थांना विश्वासात न घेता आचारसंहिता काळात भूमिपूजन आयोजित केले.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त उपक्रम

# भोसरीत "UNITY MARCH":विद्यार्थी-नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली एकतेचा संदेश

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टी भोसरी विधानसभा संघटनेतर्फे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त आयोजित "UNITY MARCH" ला शहरवासियांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या भव्य उपक्रमात विद्यार्थी, नागरिक, सामाजिक संस्था तसेच भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.**




> 'एक भारत... अखंड भारत...' या संकल्पनेतून भाजपा काम करीत आहे. सरदार पटेल यांनी दिलेल्या राष्ट्रीय एकतेच्या विचारांना दिशा मानून आम्ही शहराच्या सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात नागरिकांच्या सहभागातून उभी राहणारी ही एकजूट आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.
> **- महेश लांडगे,** आमदार,भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मार्चची सुरुवात सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, सरचिटणीस विकास डोळस, वैशाली खाड्ये, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष संतोष लोंढे, युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, उपाध्यक्ष रमेश वहिले, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, अमोल डोळस यांच्यासह सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) उपक्रमाचे संचालक गणेश भामे, तसेच 'माय भारत' संस्थेचे समन्वयक आशिष शेटे यांच्या सहकार्याने परिसरातील विविध शाळा–महाविद्यालयांचे विद्यार्थी या मार्चमध्ये सहभागी झाले. विविध सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनीही एकात्मतेचा संदेश देत मिरवणुकीत उत्साहाने सहभाग नोंदवला.

मार्चदरम्यान 'एक भारत... अखंड भारत...' अशा घोषणा देत नागरिकांनी राष्ट्रीय एकतेचा संदेश दृढ केला. शिस्तबद्ध आणि सकारात्मक वातावरणात झालेल्या या मिरवणुकीला स्थानिकांकडून मोठे कौतुक मिळाले. कार्यक्रमानंतर आयोजकांनी सर्व सहकारी, संस्था प्रतिनिधी, विद्यार्थी आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

